## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५६०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०३/०९/२०१६

**१) क्षुल्लक कारणावरून डोक्यावर काठीने मारून जिवानीशी ठार केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी ०८.३० वा. ते ०९.०० वा. दर. यातील आरोपी क्र.२ ही आपल्या घरी धुना धुत असतांना पंढरी राघो चुटे वय ४५ वर्ष रा. खुनारी याचे अंगावर धुण्याचा पाणी उडाल्याने त्यांच्यात वाद झाला. त्याच कारणा वरून असरोपी क्र. १ ने व आरोपी क्र. २ सोबत संगनमत करून मृतकाचे डोक्यावर आरोपी क्र. १ ने काठीने मारून जिवानीशी ठार केल्याने फिर्यादी सौ. वैशाली विलास चुटे रा. खुनारी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३०२,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वाढीवे पो. स्टे. पालांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) दारूच्या कारणावरून जिवाने मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील आरोपी व जखमी हे दोघेही दारू पिले होते. यातील आरोपीने जखमी वासुदेव कारू मेश्राम वय ५० वर्ष रा. पारडी यांचे सोबत दारू पिण्याचे कारणा वरून भांडन करून जखमी यास लोखंडी वासल्याने डोक्याचे मागील बाजुस मारून जखती करून जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी मनोज रतीराम हुकरे वय ४८ वर्ष रा. पारडी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३०७ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. यादव पो. स्टे. दिघारी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) दारू विक्री करण्याच्या कारणावरून भांडाण व मारहाण केले . :—**

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी १३.०० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीचे वडीला सोबत तुम्ही पोलीसांना आम्ही दारू विकतो असे नाव सांगीतले म्हणुन त्यांचे सोबत बोलुन झगडा भांडण करीत असतांना फिर्यादीने तुम्ही झगडा भांडण करू नका असे समजावित असता यातील आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करून बाजुचे वॉल कंपाऊड वरील विठ हातात धरून फिर्यादीचे तोंडावर मारून ओठाला मार लागल्याने फिर्यादी रवि मंगलसिंग चंदेल वय १८ वर्ष रा. चिचाळटोली याचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो. स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**४) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—**

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी ११.५० वा. दर. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ७५१६ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल दारू पिवुन दारूच्या नशेत सा.रू. भंडारा समोर येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे ब्रिथ अल्कोहल ॲनालॉझर मसिनव्दारे चेक केले असता अल्कोहलचे प्रमाण मिळुण आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कळमकर वानिशा. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. साबडे पो.स्टे. भंडारा हे करीत

५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, कारधा, तुमसर, आंधळगाव, गोबरवाही, साकोली व लाखनी येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २१० लिटर हातभट्टी दारु कि. १८,७५०/–रू. व देशी दारू १८ लिटर १८० मिली देशी दारू कि. ६,८८०/–रु. तसेच जुगारातुन ४,६००/–रू. असा एकुण कि. ३०,२३०/–रू. चा माल जप्त करण्यात आहे.च

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.